RNI No. MAHBIL/2012/72704
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक–अ–नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - ११, अंक - ९ ] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर १३ - १९, २०२२/आश्विन २१ - २७, शके १९४४ [ पृष्ठ ०१

## प्राधिकृत प्रकाशन

**मुख्याधिकारी यांजकडून**

**निफाड नगरपंचायत, निफाड**

**आदेश**

क्रमांक नि.न.प./बांध./कार्या-१०९४/२०२२-२३.— ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ७७ *(२)* मध्ये अंमलबजावणीसाठी मुख्याधिकाऱ्यांस या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्यांस देण्यात आलेल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार किंवा त्यांच्यावर लादण्यात आलेली अथवा त्यांच्याकडे सोपवलेली कर्तव्ये व कामे यापैकी कोणतेही कर्तव्य व काम कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याकडे किंवा कर्मचाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील त्यानुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ७७ *(२)* नुसार संबंधित अधिकाऱ्यास त्याच कार्यक्षेत्राकरिता “पदनिर्देशित अधिकारी” म्हणून अधिसूचित करणेची तरतूद करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ७७ *(२)* मधील तरतुदीनुसार नगरपंचायत मुख्याधिकारी म्हणून मला प्राप्त झालेल्या अधिकारात मी, ऋषिकेश पाटील, मुख्याधिकारी, निफाड नगरपंचायत, निफाड नगरपंचायतीच्या कार्यक्षेत्रासाठी निफाड नगरपंचायतीत कार्यरत असलेले कर निर्धारण व प्रशासकिय सेवा (श्रेणी-ब) राज्यस्तरीय संवर्ग श्री. गुलाबराव शिवाजीराव नवले यांना नगरपंचायत बांधकाम विभाग तसेच पाणीपुरवठा, आरोग्य, लेखा तसेच सामान्य प्रशासन कर विभाग इत्यादींच्या कामांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी व अधिनियमातील कलम ७७ मधील तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी माझ्या नियंत्रणाखाली “पदनिर्देशित अधिकारी” म्हणून घोषित करीत आहे.

**ऋषिकेश पाटील,**
मुख्याधिकारी,
निफाड नगरपंचायत, निफाड,
तालुका निफाड, जिल्हा नाशिक.

निफाड, २७ सप्टेंबर २०२२.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.